# भारतीय महिला परीवर्तनाची सद्यस्थिती

**प्रा. सुरेश शंकर मुळूक**

*संशोधक विद्यार्थी*

*पी. एच. डी (राज्यशास्त्र), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.*

स्त्रियांना पहिल्यापेक्षा जास्त अधिकार मिळाले आहेत हे खरे आहे. भारताच्या संविधानाप्रमाणे स्त्रिया आणि पुरूष समान आहेत. पण नुसते बोलल्याने किंवा लिहिल्याने समाज बदलत नाही आणि बदलल्याशिवाय, त्यांची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री–पुरूष समानता येऊ शकत नाही. म्हणूनच संविधानावरून समाजाच्या स्थितीचा अंदाज बांधता येत नाही. तो येतो रोजच्या जगण्यावरून लग्नाच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये तिचे शिक्षण, तिची गुणवत्ता महत्त्वाची नसून अजूनही हुंडाच महत्त्वाचा असतो.

स्त्रियांच्या सुरक्षीततेचा विचार करता, खुलेआम मुलींना बलात्काराच्या धमक्या दिल्या जातात. अगदी लहान मुलींपासून सगळया त्यांच्या बळी पडतात. समाजात एकतर्फी प्रेमातून ॲसिड फेकण्यापासून मारून टाकण्यापर्यंत घटना घडतात आणि अपराधी मात्र छाती पुढे काढून फिरत असतात. ही आहे आजची व्यथा. स्त्री–पुरूष भेदभावाचे २१शतकातील अत्यंत क्रुर उदाहरण म्हणजे स्त्रीलींगी गर्भपात म्हणजेच ह्या समाजव्यवस्थेत विज्ञान आणि तंत्रज्ञानही आपल्या विरोधी वापरले जात आहे. एकंदरीत, आपल्याबरोबर होत असलेले भेदभाव हे गर्भलिंग तपासणी, मुलींची खरीदी–विक्री, हंडाबळी, पत्नी म्हणून होणारे अपमान आणि अत्याचार, विधवा व घटस्फोटीतांना मिळणारी वर्तणूक अशा अनेक रूपांमध्ये सतत सूरूच असतात. आपल्याला हे सगळे माहित नाही किंवा आपण ह्यावर विचार करत नाही असे नाही. उलट आपण कुठल्या ना कुठल्या रूपात याची शिकार झालेले असतो. पण आपल्या डोळयांवर संस्कारांची पट्टी अशी काही बांधलेली असते की आपण याकडे डोळेझाक करतो. या चंगळवादी दुनियेमध्ये जाहीरातींच्या वाढत्या माध्यमातून स्त्रीची भोगवस्तु म्हणून प्रतिमा उभी केली जात आहे आणि यालाच सुंदरतेचे बिरूद लावले जात आहे.

स्त्री चळवळीने जे अनेक प्रश्न हाती घेतले त्यात सर्वांत तीव्र संताप व निराशा निर्माण केली बलात्काराच्या समस्येने या समस्येविरूध्द अत्यंत लढाऊ कृति केली गेली. पण त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला कार्यकर्त्या याबाबत निराश, हताशही होत होत्या. त्यांच्या भ्रमनिरासही होत होता. बलात्कार झालेल्या स्त्रियांची संख्या, त्यांनी पत्करलेले मौन, कार्यकर्त्यांनी चाचपडत घेतलेले निर्णय, समाजात रूढ असलेल्या समजुती या गोष्टीमुळे ‘बलात्कार’ या समस्येची वैचारिक उपेक्षा, प्रचलित समजुतींची व्याख्या व चिकित्सा या साऱ्याच गोष्टीबद्दल पुनर्विचार करावा लागणार आहे.

एका स्त्रीवरच्या हिंसाचाराच्या घटनेनंतर जनमताचा एवढा रेटा तयार होण्याची गेल्या कित्येक वर्षातली ही पहिलीच घटना असेल. या घटनेच्या निमित्ताने फेसबुक, ट्विटरवर बलात्काराविषयी चर्चा घडल्या, लैंगिक छळवणुकिविषयी कायदा

पुन्हा चर्चेत आला. गेली कित्येक वर्षे स्त्रीवादी चळवळीने बलात्काराच्या बाबतीत जे मुद्दे मांडायचा प्रयत्न केला होता ते मुद्दे आज मोठ्या प्रमाणावर मांडले जाऊ लागले. या संदर्भात कधी नव्हे इतका तरुण पुरुषांचाही सहभाग दिसून आला.

**स्त्रीयांवरील अन्याय–अत्याचारांची नोंद :**

आज देखील मोठ्या प्रमाणात अन्याय–अत्याचार होत असून देखील जात, वर्ग आणि पुरुषसत्तेच्या प्रभावामुळे दलित, आदिवासी आणि स्त्रीयांच्या स्वाभीमानावर होणाऱ्या दैनंदीन जातीय हल्ल्यांची नोंद केली जात नाही. अत्याचार प्रतिबंधक कायद्याविषयीचे मौन, उदासिनता, सामाजिक बहिष्कार आणि या प्रकारच्या गुन्ह्यांचे केले जाणारे वैयक्तिकीकरण इ.मुळे याविषयी पुरेशी माहिती, आकडेवारी किंवा अभ्यासात्मक माहिती उपलब्ध होणे अवघड हाते.

पोलिसात गुन्हा नोंदविला गेलाच तर तो अनेकवेळा कायद्यातील इतर कलमाखाली नोंदविला जातो. सांख्यिकी विभाग ही माहिती संकलीत करण्यास व ती जनतेसमोर आणण्यास दिरंगाई करुन या समस्येस हातभार लावते. तर बहुतांश वृत्तपत्रे अनेक अत्याचारास प्रसिद्धी देत नाहीत.

भारतामध्ये स्त्रियांवर जे अत्याचार होतात त्यामधील १० टक्के अत्याचार हे महाराष्ट्रात होतात. या तुलनेमध्ये राज्य महिला आयोगाकडे नोंदविलेल्या प्रकरणांची संख्या ही केवळ ४–५ टक्केच असते.

एका बाजूला आपण कोणीही स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल बोलले तरी शेवटचे पालुपद असते की, मानसिकता बदलली पाहिजे. मानसिकता बदलण्यासाठी म्हणून जे लोक संशोधन करतात. त्यासाठी तरतूद करावयाची वेळ आली की ती केली जात नाही ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. 'बलात्कार करणे' ही आपली 'सत्ता दाखविण्याची' एक अमानुष कृती असते. आपले वर्चस्व प्रस्थापित करणे, धडा शिकवणे, उन्माद व्यक्त करणे हे उद्देश त्यामागे असतात. ही सत्ता पुरुषी असण्याची आणि त्याबरोबरच पैसा, जात, धार्मिक बहुसंख्यांकत्व, पद, अधिकार यापैकी एक किंवा अनेक एकत्रित अशी कशाचीही असू शकते.

बलात्कार 'इंडियात होतात, भारतात नव्हे' असे भागवत म्हणतात. भारतात मथूरा, भंवरीदेवी, कोठेवाडी, खैरलांजी, कोपर्डी या घटना कुठे घडल्या? खेड्यातच घडल्या. स्त्रियांवरील अत्याचार सर्वाधिक प्रमाणात ग्रामीण भागात होत असल्याची आकडेवारी उपलब्ध आहे. मुळात पाश्चात्य संस्कृतीमुळेच स्त्रियांवर अत्याचार होतात हे खरे नाही. तसे असते तर प्रगत देशात घरोघरी 'रेपिस्ट' निर्माण झाले असते.

स्त्रीच्या लैंगिक चारित्र्याचा पूर्वेतिहास हा बलात्काराच्या खटल्यात गैरलागू आहे हा मुद्दा न्यायाधिशांनी सुमनरानी खटल्यातील पूनर्परीक्षणाच्या अर्ज फेटाळताना दिलेल्या निकालपत्रात मांडला होता. स्त्रीची बाजू घेणाऱ्या निकालपत्रामध्येही न्यायाधिश जी मनोवृत्ती दाखवितात ती परंपरावादीच असते. त्यांना स्त्रीचे कौमार्य, पवित्र, लग्नाची शक्यता याची फक्त काळजी लागलेली असते. स्त्रीच्या लैंगिकतेवर हल्ला झाल्याने तिला होणाऱ्या मानसिक आघाताचे त्यांना भानही नसते.

बलात्काराच्या कायद्याबाबतचे अनेक प्रश्न आज स्त्री चळवळींला भेडसावत आहेत. अपील करण्याची परवानगी देणारा, दोन–तीन वर्षानंतर लागणारा निकाल हा स्त्रीला खरा न्याय देऊ शकतो का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शहरातील स्थिती तर याहुनही वाईट आहे.

**संदर्भ सूची :**


१. Anoysius Irudayam S.J. Jayashree P. Mangaubhi, joel. G. Lee, 2006, violence against women in India, vol.1. New Delhi, NCDHR, p-108

२. YASHADA, Pune vkf.k 'Caste Atrocity in Khairlanji Manuski' Advocacy Centre, Pune P-2

३. गोऱ्हे नीलम, 'विधान परिषद व माझे कामकाज', (२००८), पद्मगंधा प्रकाशन, पुणे

४. महाराष्ट्र टाईम्स, पुणे, जानेवारी २०१७, (महाराष्ट्र टाईम्स, ८ जानेवारी १७, पुणे)